## ग्रंथांच्या सहवासात

# ...तरी मी अल्पपठित!

— जयंत नारळीकर

एक लहानपणची आठवण... वय वर्षे चार ते पाच दरम्यानचे. अलीकडच्यासारखी प्री-नर्सरी वगैरेचे शाळेचे शेपूट नसल्याने मी व माझा धाकटा भाऊ घरीच हुंदडत असू. त्या दिवशी फरशीवर पसरलेल्या गादीवर आम्ही दोघे लॉंग जंपची प्रॅक्टिस करीत होतो. त्यांत उत्साहाच्याभरात लॉंग जंपचे माझे पूर्वीचे रेकॉर्ड ब्रेक झाले. आणि त्याचबरोबर पायांनी समोरच्या पुस्तकांच्या कपाटाची काच पण ब्रेक झाली. पायात घुसलेली काच काढायला हॉस्पिटलची वाट धरावी लागली व जखमेची खूण अजूनही दिसते.

पण वस्तुस्थितीच अशी होती की, घरात सर्वत्र पुस्तकांची कपाटे. निजायबसायच्या मोकळ्या जागेत पुस्तके नांदायला येत. तेव्हा असे काही तरी केव्हा तरी घडणार, हे जणू निश्चितच होते. वाचायला येण्यापूर्वी पुस्तकांशी माझा संबंध आला तो असा.

आज त्यातली काही पुस्तके अजून माझ्याकडे आहेत. ते कपाटही आहे. अर्थात बदललेल्या काचेसकट. हा मला वडिलांच्याकडून मिळालेला वारसा, पुस्तकांचा आणि पुस्तकप्रेमाचा. मध्यमवर्गातला माणूस आजच्याप्रमाणे पाचदशकांपूर्वीसुद्धा, जीवनावश्यक गरजा भागवून उरलेली मिळकत प्लॉटमध्ये गुंतवण्यात, साड्या, दागिने घेण्यात किंवा जमल्यास फ्रिज, मोटार आदीसाठी खर्च करीत असे. माझ्या वडिलांच्या लेखी ह्या सर्व गोष्टी नगण्य असून अग्रक्रम होता पुस्तकांचा. जरी आम्हा दोघांना त्यांनी खेळण्याची कमतरता भासू दिली नाही, तरी त्यांचा खरा उत्साह पुस्तके खरीदण्यात दिसून येई.

घरी येणाऱ्या चंदेरी-बिंदेरी साडी विक्रेत्यांना त्यांनी उलट पावली परत पाठवले. पण पुस्तक विक्रेत्यांचे मुक्तहस्ताने स्वागत केले. 'पंच' ह्या प्रख्यात इंग्रजी विनोदी नियत-कालिकातील व्यंगचित्रांची विषयानुरूप वीस पुस्तकांत विभागणी करून तयार केलेला संच घेऊन एक विक्रेता आमच्या घरी आला, त्यावेळी (पु. लं.ची उपमा वापरून) पुंडलिकाभेटी परब्रह्म आल्याचा आनंद त्यांना झाला. ते दृश्य आजही डोळ्यासमोर आहे... व तो संच आज 'त्याच' कपाटात ठेवला आहे.

### चंदू–गोट्या ते चिमणराव

माझी ग्रंथसाधना अशा प्रेरणेतून सुरू झाली. केशव भिकाजी ढवळे प्रकाशित दोन–चार आण्यांपासून मिळणाऱ्या गोष्टींच्या पुस्तकातून पुढे जात, चंदू – गोट्या – वसंतची पारायणे करत आम्ही चिमणराव गुंड्याभाऊपर्यंत सहज पोचलो कारण आजच्यासारखी वाचनापासून (पुस्तकांच्या !) परावृत्त करणारी 'कामिके' उपलब्ध नव्हती. ही झाली मराठीची हकीगत. बनारस ते कोल्हापूर उन्हाळ्याच्या सुट्टीच्या दोन-चार वर्षांतून एकदा घडणाऱ्या यात्रेत ही ग्रंथसंपदा वाढत गेली. हिंदी पुस्तकांची तहान अर्थातच बनारसमध्येच भागत असे. लहान–मोठ्या साहसकथा – रहस्य-कथांपासून प्रेमचंदपर्यंत गोदौलिया – चौक – कचौडीगली ह्या परिसरात पुस्तके मुबलक मिळत.

शालेय जीवनातली आणखी एक आठवण. इंग्रजीच्या तासात वेगवेगळ्या पत्रांचे नमुने शिकवले जात. त्यात व्ही. पी.ने पुस्तके मागवण्याचे पत्र होते. त्यावेळी पी. जी. वुडहाऊसची नवी पुस्तके मला हवी होती. वडिलांच्या संमतीने मी न्यू बुक कंपनी, हॉर्नूबी रोड, मुंबईकडे व्ही. पी.ची ऑर्डर पाठवली. आणि काही दिवसांनी ती पुस्तके घरपोच मिळाली, तेव्हा नवी पुस्तके वाचायला मिळाल्याचा आनंद द्विगुणित झाला व क्रमाक्रमाने आणखी वुडहाऊस आणि डब्ल्यू. डब्ल्यू. जेकब्स ह्याच मार्गाने घरी आले.

पुढे केंब्रिजला शिकायला गेलो तेव्हा माझ्या मामांनी (कै. प्रा. वसंतराव हुजुरबाजार) मला केंब्रिजबद्दलची पुष्कळशी उपयोगी माहिती दिली. त्यात केंब्रिजच्या तीन प्रख्यात पुस्तकांच्या दुकाने पण समाविष्ट होती. बोज ॲण्ड बोज (सर्वात जुने), हेफर्स (सर्वात मोठे) आणि गॅलोवे ॲण्ड पोर्टर अशी ती तीन दुकाने. हेफर्सचे मॅनेजर (सायंस सेक्शन) स्टोकली हे माझ्या मामांच्या वेळी (१९४६-४९) तर होतेच; पण माझ्या वडिलांच्या काळी (१९२८-३२) देखील त्या दुकानात होते, आणि दोघांना ओळखत होते. नवे प्रवेश मिळवलेले विद्यार्थी आणि लीव्हिस, फॉर्स्टरसारखे साहित्यातले दिग्गज किंवा डिरॅक, कॉक्रॉफ्टसारखे नोबेल पारितोषिक विजेते सर्वांचेच ह्या दुकानांत अगत्याने स्वागत होते. अजूनही केंब्रिजला गेलो की हेफर्सची चक्कर हमखास असते.

### हस्तिनापुरातील विदुर

परंतु ह्या ग्रंथांच्या हस्तिनापुरात एक विदुरही आहे. एका लहानशा बोळात डेव्हिडचे पुस्तकांचे दुकान आहे; जिथे जाणकारांची गर्दी असते. इथले आकर्षण जुन्या पुस्तकांचे (सेकंड हॅण्ड !). अशा पुस्तकांची चवड दुकानाबाहेर व आतही मांडलेली असते. किंमत ? मी विद्यार्थी असताना सहा पेनी किंवा शिलिंग फार तर फ्लॉरिन... आज पाऊंडापर्यंत. सामान्य रहस्यकथांपासून दुर्मिळ पुस्तकांपर्यंत काहीही ह्या चवडीत सापडावे, आणि चोखंदळांनी निवडावे. माझ्या ग्रंथसंपदेत डेव्हिडतर्फेही भर पडली आहे.


परंतु एका पुस्तकाबाबतीत मात्र केंब्रिजने माझी निराशा केली. काही पुस्तके, त्यांची साहित्यिक प्रतिष्ठा सामान्य असली तरी वाचावीशी, निदान पहावीशी वाटतात, तसले हे पुस्तक. लहानपणी मी नाथमाधवांच्या 'वीरधवल' कादंबरीची पारायणे केली होती. प्रस्तावनेत लेखकाने ही कादंबरी रेनॉल्डसूच्या 'केनेथ' कादंबरीवर आधारित आहे अशी कबुली दिली होती. प्रत्यक्ष वाचताना काही वर्णने 'भारतीय बनावटीची' नाहीत असे जाणवते. तेव्हा स्कॉटिश हायलंडस् पाहून आल्यावर त्या पार्श्वभूमीवरील मूळ 'केनेथ' कादंबरी वाचायची मला इच्छा झाली.

केंब्रिज विद्यापीठाची लायब्ररी कॉपीराइट ॲक्टप्रमाणे छापलेल्या पुस्तकांची एक प्रत ठेवत असे. तेथील कॅटलॉगमध्ये 'केनेथ'चा उल्लेख होता पण प्रत नव्हती. ती फक्त ब्रिटिश (म्यूजियमच्या) लायब्ररीत आहे, असे लिहिले होते. मी ब्रिटिश लायब्ररीला पत्र लिहून विचारले. त्यांचे उत्तर आले : ''होय ! प्रत इथे उपलब्ध आहे. परंतु पाने फार जीर्ण झाल्याने ती आम्ही 'इंटर-लायब्ररी लोन'खाली पाठवू शकत नाही.' मात्र तुम्ही इथे येऊन वाचू शकता.''

मी तो नाद सोडला. काही वर्षांनी वॉशिंग्टन येथील प्रचंड लायब्ररी ऑफ काँग्रेस येथे उच्च पदावर असलेल्या एका ओळखीच्या जपानी बाईंजवळ मी केनेथबद्दल चवकशी केली. ते पुस्तक तेथेही नव्हते. परंतु बाईंनी चिकाटी दाखवून अमेरिकेत ते कुठल्या ग्रंथालयात उपलब्ध असेल ते शोधून काढले. पाच शहरांतल्या ग्रंथालयात ती कॉपी होती पण (ब्रिटिश लायब्ररीप्रमाणेच) तिचे वाचन तेथेच करायला हवे. ती शहरे माझ्या नेहमीच्या दौऱ्यांत बसत नसल्याने मी तो नादही सोडून दिला.

त्यावेळी मी मुंबईत स्थायिक झालो होतो. टाटा इंस्टिट्यूटचे ग्रंथपाल डॉ. हावनूर यांना गंमत म्हणून मी ही हकीगत सांगितली. ते म्हणाले, ''मी मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात चवकशी करून पाहतो... कदाचित् तेथे असू शकेल.'' मी चेष्टेने हसलो. जे पुस्तक जगातल्या मोठ्या ग्रंथालयात मिळू शकले नाही, ते मुंबईत कसे असेल ? पण मला वाटते सगळेच कसलेले ग्रंथपाल चिकाटी दाखवतात. काही दिवसांनी हावनूरांनी सांगितले ''युरेका ! ते पुस्तक मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे – पण ते जीर्ण असल्यामुळे मला तेथेच जाऊन वाचावे लागेल.'' हरकत नाही. नेव्हीनगर ते काळा घोडा अंतर फार नव्हते व मला अखेर ते पुस्तक पहायला मिळाले. (आणि अलीकडे त्यापलीकडे चिकाटी दाखवून आयुकाच्या ग्रंथपाल सौ. मालेगावकर यांनी ती प्रतच फोटो कॉपी करून मला आणून दिली !)

वीरधवल – केनेथचा किस्सा सांगण्यामागचा हेतू इतकाच की एखादे पुस्तक अनेक प्रयत्न करून मिळवावे लागते आणि ते हाती आले की एखादा दीर्घकालीन प्रश्न सुटल्याचे समाधान वाटते.



जागेअभावी माझ्या वडिलांनी बरीच पुस्तके शिक्षणसंस्थांना देऊन टाकली. पण आज त्यांचा पुस्तकरूपी वारसा माझ्या ग्रंथसंपदेचा महत्त्वाचा भाग ठरला आहे. टागोर, सावरकर, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, राधाकृष्णन्, बर्नर्ड शॉ, गिबन, विल डुरांट, टॉइनबी, शोलेम ॲश, डोस्टोएव्हस्की यांच्या- बरोबर वुडहाऊस, लीकॉक आणि जेकब्स सुखाने नांदत आहेत. संस्कृत ग्रंथांबरोबर गीताप्रेसचे 'कल्याण' मासिकाचे विशेषांक (– त्यांत नाना पुराण निगमागमाशिवाय आहे तुलसीदासांचे रामचरितमानस) आमच्या कपाटांची शोभा वाढवीत आहेत. हिंदी मराठी साहित्य आहे...

ही झाली मुख्यत्वे करून साहित्यातील पुस्तकांची कथा आणि व्यथा ! मला लहानपणापासून गणित आणि विज्ञानाच्या ग्रंथांचा सहवासपण लाभला आहे. त्यापैकी मनोरंजनपर ग्रंथांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

### चुकीचे समीकरण

गणित म्हणजे डोक्यावरून जाणारी (आणि आता पॉकिट कॅलक्युलेटरमधून जाणारी) आकडेमोड असे एक समीकरण निर्माण झाले आहे, ते सर्वस्वी चुकीचे आहे. त्याचप्रमाणे डोक्यात वेगाने गुणाकार – भागाकार – वर्गमूळ तारखेचा वार करून सांगणारे प्रतिभावंत गणिती असतात, हे दुसरे लोकप्रिय पण चुकीचे समीकरण. अशा गैर- समजुतींपासून दूर नेऊन गणिताचे वास्तविक दर्शन घडवणारी पुस्तकेपण आहेत. पण दुर्दैवाने भारतात अजून ती दुर्लक्षिली जातात.

मराठीत मला सुदैवाने असे एक पुस्तक – तीन भागांतून – लहानपणीच पहायला मिळाले. ते म्हणजे 'बहुरंगी करमणूक' (लेखक रा. त्र्यं. रानडे). आज ते पुनर्मुद्रित झाले आहे. जशी माझी 'गोट्या', 'चंदू' आणि 'वसंत' यांनी करमणूक केली, तशीच ह्या तीन खंडानीपण. पुढे इंग्रजीतून प्रसिद्ध झालेला प्रचंड खजिना मला हळूहळू गवसला. माझ्या वसंत मामांनी लॅन्सेलॉट हॉग्‌बेनचे 'मॅन मस्ट मेझर' हे सचित्र आकर्षक पुस्तक मला आणि माझ्या भावाला भेट दिले तेव्हा माझे वडील म्हणाल्याचे आठवते 'हे सुंदर पुस्तक लक्षाधीशांसाठी असावे.' नाही तरी मोठ्या आकड्यांना काबूत आणून त्यांचे गुणधर्म शोधणारे गणिती लक्षाधीशच नव्हेत का ?

अशा पुस्तकांशिवाय 'सायंटिफिक अमेरिकन' मासिकात वर्षांनुवर्षे 'मॅथेमॅटिकल गेम्स' सदर चालवणाऱ्या मार्टिन गार्डनरने पैदा केलेले साहित्य गणित व त्यामागच्या तर्कशास्त्रीय बांधणीचे आकर्षक स्वरूप दाखवते. कूटप्रश्नांतून गणितीसार सांगणे ही किमया गार्डनरप्रमाणे आणखी काही निवडक लोकांना जमते. न्यूमनचे चार खंडी 'द वर्ल्ड ऑफ मॅथेमॅटिक्स' गणिताची विविधरंगी रूपे वेगवेगळ्या संदर्भांत वाचकांसमोर मांडते. नेल्सनने ट्राफलगारची लढाई स्वतःचे आरमार शत्रूच्या आरमारापेक्षा छोटे असूनही जिंकली. कारण त्याने शत्रूचे आरमार दोन भागात वेगळे करून आधी एक भाग आणि मग दुसरा असे – एकापाठोपाठ दुसरा – मोडून काढले. ही विभागणी त्याने आपल्या अनुभवाने केली असली तरी गणिताच्या दृष्टिकोनातून बिनचूक होती. ही चर्चा न्यूमनच्या पुस्तकातील 'गणित आणि युद्धशास्त्र' ह्या विषयावरील लेखात आहे.

### शास्त्रज्ञ आणि गणितज्ञ

माझ्या ग्रंथसंग्रहात गणित आणि विज्ञानाच्या इतिहासावरील आणि शास्त्रज्ञ - गणितज्ञ यांच्या जीवनांवर पुस्तके आहेत. आपण शाळाकॉलेजात शिकतो ते गणित व विज्ञान नरिपक्वावस्थेत असते. एखादे रुचकर जेवण जेवताना आपण असा कधी विचार करीत नाही, की हे उत्तम पदार्थ तयार करण्याची कला आणि माहिती कशी पैदा झाली ? पुरणपोळी कोण्या स्वयंपाक्याने पहिल्यांदा केली, तिच्यामागे संशोधन खचित असणार. तसेच विज्ञानाबाबत. पृथ्वी सूर्याभोवती फिरते का सूर्य पृथ्वीभोवती ? अणूचे विभाजन होऊ शकते का ? ज्वलनक्रियेत नेमके काय घडते ? आपली पाठ्यपुस्तके काही ओळीत उत्तरे सांगतात. आपल्या शिक्षणप्रणालीचे दुर्दैव की त्या ओळी जशाच्या तशा पाठ करून परीक्षेत 'पुनःप्रक्षेपित' करून (– नाही तरी नॅशनल प्रोग्रॅम आपले लोकल स्टेशन जसेच्या तसे प्रक्षेपित करते त्या पलीकडे आपली परीक्षा स्कॉलर लोकांकडून काय वेगळी अपेक्षा करते ?) मार्क मिळविणारे संशोधनामागची व्यथा आणि आनंद दोन्हींना मुकतात.

वैज्ञानिकांबद्दलच्या तोकड्या माहितीत त्यांची यशगाथा आपल्या पाठ्यपुस्तकात वाचायला मिळते. पण त्यांच्या यशामागचे अनेक असफल प्रयत्न, चुकीच्या मार्गाने जाऊन परत येणे, सामान्य माणसाप्रमाणेच त्यांच्या स्वभावातील गुण - दोष यांचे वर्णन किती तरी अधिक रोचक आणि अधिक माहितीपूर्ण असते. एरिक टेंपल बेलचे प्रख्यात पुस्तक 'मेन ऑफ मॅथेमॅटिक्स' अशा किती तरी किश्श्यांतून गणितज्ञांची जवळून ओळख करून देते.

विज्ञानाचा इतिहास सांगणारी पुस्तके, मला वाटते व्यावसायिक शास्त्रज्ञांनीच नव्हे, तर इतरांनी पण वाचावी म्हणजे त्यांतून विज्ञानाचा आवाका कळतो, त्याच्या मर्यादा पण जाणवतात. माझ्या ग्रंथसंपदेत वेळोवेळी अशा पुस्तकांची मी भर घालीत असतो.

### चरित्रांचे प्रकार

अलीकडच्या शास्त्रज्ञांची चरित्रे - आत्मचरित्रे वाचण्यात मला विशेष रस असतो, कारण काहींशी माझा प्रत्यक्ष संबंध आलेला असतो. पण यांचे प्रकार विविध असतात. एका टोकाला पुष्कळ वर्षांचा अभ्यास करून लिहिलेली चरित्रे – आइन्स्टाईन यांचे अब्राहम पाइस यांनी लिहिलेले किंवा चंद्रशेखर यांचे कामेश्वरवाली यांनी लिहिलेले – पुष्कळ माहितीपूर्ण असतात. तर दुसऱ्या टोकाला वर्ष सहा महिन्यांत खरडलेली आणि भडक पण फार काळ न टिकणारी (दुर्दैवाने स्टीवन हॉकिंग यांच्या नशिबी असेच चरित्रकार आले !) रिचर्ड फाइनूमनच्या आठवणी (शुअर्ली यू आर जोकिंग मिस्टर फाइनूमन) आणि त्याचे अलीकडले चरित्र त्याच्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच आहेत.

शेवटी असा प्रश्न येतो : यातील किती पुस्तके मी वाचली आहेत ? माझ्या वडिलांच्या तुलनेत मी स्वतःला अल्पपठित समजतो. त्यांच्या वाचनाचा आवाका माझ्यात अद्याप नाही – पुढे कधी येईल असे वाटत नाही. पण ग्रंथांशी जवळीक वाटण्याजोगे माझे वाचन खचित आहे. वाचायची इच्छा असून व पुस्तक हाताशी असून ते वाचता येऊ नये, कारण वेळेचा अभाव... असा दुर्दैवी प्रसंग अनेकदा येतो. मग इतकी ग्रंथसंपदा जवळ बाळगा कशाला ? कारण वाचायची इच्छा झाली आणि वेळ उपलब्ध असला तर पुस्तक हाताशी असावे ! ■